(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर)

प्रकाशनयोग्य

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

दिवाणी अपीलीय अधिकारीता

दिवाणी अपील क्र. ११४००-११४०१/२०१८

सीमाशुल्क केंद्रीय उत्पादनशुल्क आणि

सेवा कर आयुक्त, ...अपीलार्थी

विरुद्ध

मेसर्स सुझलॉन एनर्जी लि. ....उत्तरवादी

<u>न्यायनिर्णय</u>

एम. आर. शहा, न्या.

१. सीमाशुल्क, उत्पादनशुल्क आणि सेवा कर अपीलीय न्यायाधिकरण, मुंबई येथील पश्चिम विभागीय खंडपीठाने (यापुढे “सी उ से क अ न्या” म्हणून संबोधले जाईल) अपील क्रमांक एसटी /८७५८९ आणि ८७५९०/२०१३ मध्ये दिनांक ०२.०५.२०१८ रोजी दिलेल्या आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश,

ज्याद्वारे “सी उ से क अ न्या” ' ने उत्तरवादी - मेसर्स सुझलॉन एनर्जी लिमिटेड (यापुढे ज्याला उत्तरवादी असे संबोधले जाईल) यांनी दाखल केलेले अपील मान्य केले आणि असा निर्णय दिला की, उत्तरवादी यांनी पवन विद्युत जनित्राची (संक्षेपकारिता उल्लेख ‘प वि ज’) निर्मिती करण्याच्या उद्देशाने आयात केलेल्या विविध "अभियांत्रिकी संकल्पचित्र आणि रेखाचित्रे" यांच्या मॉडेल्स वर (नमुन्यावर) कलम ६५(३५बी) सह वित्त अधिनियम १९९४ चे कलम ६५(१०५) (झेड झेड झेड झेड डी) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे, "संकल्पचित्र सेवा" या प्रवर्गाखाली जून, २००७ ते सप्टेंबर, २०१० या कालावधीसाठी सेवा कर आकारण्या योग्य नाही, याने व्यथित आणि असमाधानी होऊन महसूल खात्याने प्रस्तुत चे अपील दाखल केले आहे.

२. आणि असे की, यातील उत्तरवादी विविध करपात्र सेवा पुरवित होते. उत्तरवादी देखील ‘पविज’ च्या निर्मिती क्षेत्रामध्ये होते. जर्मनी आणि नेदरलँड्समध्ये त्यांच्या तीन उपकंपन्या आहेत ज्यांच्याशी उत्पादन विकास आणि खरेदी करार करण्यात आला होता.

२.१ उत्तरवादीने दिनांक ०१.०४.२००७ रोजी (०१.०१.२००७ पासून) मेसर्स सुझलॉन एनर्जी जीएमबीएच, जर्मनी, या सहयोगी कंपनीशी भारतीय प्रदेशात केवळ ‘पविज’ च्या निर्मितीकरिता वापरावयाचा उत्पादन विकास आणि खरेदी

करार केला होता. या कराराच्या परिच्छेद १.१० मध्ये उत्पादने विशेषतः परिभाषित करण्यात आली होती.

२.२ उत्तरवादीने, या संकल्पचित्राची आयात करताना कस्टम अधिकाऱ्यांकडे प्रवेश देयक (बिल ऑफ एंट्री) दाखल केले आणि सीमाशुल्क दरपत्रकाच्या (टॅरीफ) प्रकरण उप-शीर्षक क्रमांक ४९११९९२० अंतर्गत "कागद" म्हणून वर्गीकृत केले आणि बीसीडी साठी अधिसूचना क्रमांक ०२१/२००२ आणि सीव्हीडी साठी अधिसूचना क्रमांक ०२० / २००६ अंतर्गत सीमा शुल्काच्या 'शून्य' दराच्या लाभाचा दावा केला. उत्तरवादीने असा दावा केला की, त्यांनी कस्टम मार्गाने प्रवेश देयके दाखल करून प्राप्त केलेली संकल्पचित्रे आणि रेखाचित्रे "सेवा" नसून "वस्तू" असल्याने त्यांना सेवा अदा करण्याची आवश्यकता नव्हती.

२.३ लेखा परीक्षणादरम्यान, असे लक्षात आले की, उत्तरवादीने विविध मॉडेल्सची "अभियांत्रिकी संकल्पचित्र आणि रेखाचित्रे" ज्याचा वापर ‘पविज’ च्या निर्मितीमध्ये केला गेला होता, जे "संकल्पचित्र सेवा" या प्रवर्गा अंतर्गत वर्गीकरण करण्या योग्य होते त्यावर जून २००७ ते सप्टेंबर २०१० या कालावधीसाठी सेवा कर भरला नाही.

२.४ यातील अपीलकर्ता - सीमाशुल्क, केंद्रीय उत्पादन शुल्क आणि सेवा कर आयुक्त, पुणे यांनी दिनांक १५.१२.२००१ रोजी उत्तरवादीला वित्त अधिनियमाच्या प्रकरण ५ च्या कलम ७३ खालील तरतुदींन्वये त्यांनी दिलेल्या करपात्र सेवांच्या मूल्यावर त्याला रु. १८,४२,९९,६५२/- इतक्या सेवा कराची आणि वित्त अधिनियमाच्या प्रकरण ६ च्या कलम ८५ अन्वये उपकराची मागणी का करण्यात येऊ नये याची कारणे दाखवा असे फर्मावणारी नोटीस जारी केली आणि उत्तरवादी यांना, वित्त अधिनियमाच्या कलम ७५ अंतर्गत व्याज आणि कलम ७६ आणि ७८ अंतर्गत दंड अदा करावा असेही फर्मावले. त्यानंतरच्या कालावधीसाठी, म्हणजे, ऑक्टोबर, २०१० ते सप्टेंबर, २०११ या कालावधीसाठी मे. एसइजी आणि मेसर्स सुझलॉन ब्लेड टेक्नॉलॉजी, नेदरलँड यांच्याकडून "संकल्पचित्र सेवा" च्या मूल्यावर रु. ३,३६,२८,५१५/- इतक्या सेवा कराची मागणी करणारी आणखी एक कारणे दाखवा नोटीस दिनांक २०.०४.२०१२ रोजी जारी करण्यात आली होती.

२.५ दिनांक २५.०३.२०१२ च्या मूळ आदेशानुसार, यातील आयुक्त - अपीलकर्त्याने वित्त अधिनियम १९९४ चे कलम ६५(१०५) (झेड झेड झेड झेड डी) अन्वये आणि कलम ६५(३५बी) मधील सेवा या संज्ञेच्या व्याख्येनुसार करपात्र " संकल्पचित्र सेवा" चे पुरवठादार म्हणून, कारणे दाखवा नोटीसमध्ये

केलेली मागणी कायम केली. आयुक्तांनी व्याज तसेच दंडाची आकारणी केली.

२.६ सेवा कराची मागणी करणाऱ्या तसेच व्याज आणि दंडाची देखील आकारणी करणाऱ्या मूळ आदेशामुळे व्यथित होऊन, उत्तरवादीने "सी उ से क अ न्या" यांच्या विरुद्ध अपील दाखल केले. "सी उ से क अ न्या" यांनी **सोजीत्झ कॉर्पोरेशन विरुद्ध सेवा कर आयुक्त, नवी दिल्ली ह्या २००९ (१४) एस टी आर ६४२ (ट्राय. दिल्ली)** मध्ये नोंदविलेल्या या प्रकरणातील त्यांच्या पूर्वीच्या निर्णयावर भिस्त ठेवून आक्षेपित सामायिक आदेशान्वये प्रस्तुतचे अपील मान्य केले आणि असा निर्णय दिला की, प्रस्तुतचे संकल्पचित्र आणि रेखाचित्रे, सेवा नसून वस्तू आहे. "सी उ से क अ न्या" यांनी असेही निरीक्षण केले आणि निर्णय दिला कि वस्तू आणि सेवांची कर आकारणी परस्पर आणि स्पष्टपणे संकल्पित आकारणी आहे आणि म्हणून एकाच क्रियेवर वस्तू आणि सेवा म्हणून कर आकारला जाऊ शकत नाही. परिणामी "सी उ से क अ न्या" यांनी, 'रेखाचित्र आणि संकल्पचित्र' याना वस्तू म्हणून समजण्यात यावे आणि त्यामुळे त्यांना सेवा असे समजत येणार नाही, या कारणास्तव मूळ आदेश रद्द केले आहे.

२.७. "सी उ से क अ न्या" यांनी पारित केलेल्या आक्षेपित आदेशाने व्यथित आणि असमाधानी होऊन महसूल खाते यांनी प्रस्तुतचे अपील दाखल केले आहे.

३. श्री. एन. वेंकटरामन, भारताचे विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्ता यांनी महसूल खात्याच्या वतीने उपस्थित राहून असे सादर केले आहे की, या न्यायालयाच्या विचारार्थ कायद्याचा एक महत्त्वपूर्ण प्रश्न उद्भवतो की, उत्तरवादी यांनी 'पविज'ची निर्मिती करण्याच्या उद्देशाने आयात केलेल्या "अभियांत्रिकी संकल्पचित्र आणि रेखाचित्रे" यांच्या विविध नमुन्यांवर कलम ६५(३५बी) सह वित्त अधिनियम १९९४ चे कलम ६५(१०५) (झेड झेड झेड झेड डी) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे, "संकल्पचित्र सेवा" या प्रवर्गाखाली जून २००७ ते सप्टेंबर २०१० सेवा कर आकारण्यायोग्य आहे का?

३.१ श्री एन. वेंकटरामन, विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्ता यांनी असे सादर केले आहे की, उत्तरवादी यांचे असे कथन की, सर्व वेळी माध्यमांमध्ये टाकलेली बौद्धिक संपदा नेहमीच 'सेवा' म्हणून नव्हे तर 'वस्तू' म्हणून वर्गीकृत केली जाईल, हे कायद्याचे अचूक विधान असू शकत नाही. असे सादर केले आहे की, केवळ बौद्धिक संपदा माध्यमांमध्ये टाकल्यामुळे, ते स्वतः त्याला वस्तू करणार नाही. करार करणाऱ्या पक्षकारांनी ते हस्तांतरण किंवा मालाची विक्री म्हणून समजले आहे की नाही यावर ते अवलंबून असेल. असे सादर केले आहे की, टेलरमेड (विशिष्ट मापांनी तयार करण्यात आलेली रेखाचित्रे) किंवा तयार रेखाचित्रांच्या संचाची आयात ही वस्तूंची विक्री होईल, तर जर एखाद्या

व्यक्तीने चित्रकाराला योग्य प्रकारे तयार केलेल्या कॅनव्हासवर त्याच्या आवडीचे आणि त्याच्या वैशिष्ट्यांनुसार चित्र काढण्यासाठी आणि ते वितरित करण्यासाठी प्रतिबद्ध केले तर ती केवळ सेवा होईल कारण चित्रकाराने आपली संपूर्ण बौद्धिक संपदा विशिष्ट ग्राहकासाठी आणि त्याच्या वैशिष्ट्यांनुसार चित्र रेखाटण्यात गुंतवलेली असते आणि जसजसा तो पेंटिंगमध्ये प्रगती करतो, ती एका विशिष्ट ग्राहकासाठी असते.

३.२ असे सादर करण्यात आले की, हे "संकल्पचित्र आणि रेखाचित्रे" यांच्या बाबतीत देखील होऊ शकते. हे सादर करण्यात आले की एखाद्या विशिष्ट ग्राहकाच्या वैशिष्ट्यांना योग्य अशी रेखाचित्रे आणि संकल्पचित्रे सेवा कराराअंतर्गत तयार करण्याच्या तुलनेत टेलरमेड रेखाचित्रे आणि संकल्पचित्रे यांचा संच किंवा तयार रेखाचित्रे आणि संकल्पचित्रे यांचा संच याचा एक वेगळा खंड तयार करेल.

३.३ वस्तूंची विक्री आणि सेवा करार यांच्यातील फरक यावरील त्यांच्या निवेदनाच्या समर्थनार्थ , श्री एन. वेंकटरामन, विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्ता यांनी **बी एस एन एल विरुद्ध युनियन ऑफ इंडिया ह्या (२००६) ३ एस सी सी १** (परि . ४४ आणि ४५) मध्ये नोंदविलेल्या, ह्या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयावर खूप भिस्त ठेवली आहे.

बीएसएनएल (उपरोल्लेखित) या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयावर आणि वस्तूंची विक्री आणि सेवेचा करार यातील फरक, यावर श्री एन. वेंकटरामन यांनी खालील निवेदन केले आहे:

अ) असे मानण्यात आले की पारंपारिक अर्थाने विक्रीचा अर्थ गॅनॉन डंकरली चाचणी असा होईल आणि वस्तू आणि सेवा या दोन्हींचा समावेश असलेली मानीव विक्री ही केवळ कामाचा करार आणि अन्न करार यापुरती मर्यादित असेल;

ब) त्याने हे स्पष्ट केले आहे की हा व्यवहार म्हणजे विक्री आहे असे गृहीत धरण्याचा आणि नंतर माल काय असू शकतो हे पाहण्याचा अनुच्छेद ३६६ (२९अ) परवाना देत नाही. हा एक चुकीचा दृष्टीकोन असेल कारण ४६ व्या दुरुस्तीद्वारे वस्तू या अभिव्यक्तीमध्ये बदल केला गेला नाही आणि विक्रीचे घटक हीच व्याख्या पुढे चालू ठेवतात;

क) तथापि, याचा अर्थ असा नाही की संकल्पनांचा मजकूर स्थिर राहतो, आणि न्यायालये काळाबरोबर पुढे गेली पाहिजेत;

ड) अनुच्छेद ३६६(२९अ) रूग्णालय सेवा, वकील सेवा आणि इतर व्यावसायिक सेवा समाविष्ट करण्याची मागणी करत नाही, जेथे अशा सेवा

प्रदान करताना, वस्तूंचे हस्तांतरण होऊ शकते असे धरून पुढे गेले ;

इ) रूग्णालयात रूग्णावर उपचार करणे आणि उपचारादरम्यान गोळ्या देणे हे विक्रीसमान होणार नाही;

फ) जेव्हा एखादा डॉक्टर औषधयोजना लिहून देतो किंवा वकील कागदपत्राचा मसुदा तयार करतो आणि तो त्याच्या रुग्णाला / पक्षकाराला देतो, स्पष्टपणे बोलायचे झाले तर, फी भरून, दोन्ही प्रकरणांमध्ये कागदपत्रांसाठी मोबदला रुग्ण किंवा पक्षकाराकडून डॉक्टर किंवा वकिलाकडे जात नाही. ;

ग) तथापि, या केवळ सेवा आहेत आणि नोंद ५४ यादी २ च्या उद्देशाकरिता विक्रीचा समावेश करत नाही;

ह) कारण असे आहे की शेवटी एखाद्याला गॅनन डंकरली चाचणी लागू करावी लागेल. अनुच्छेद ३६६(२९अ) मधील अपवाद वगळता इतर कोणत्याही परिस्थितीत, संमिश्र स्वरूपातील कराराचे दस्त असल्यास, जोपर्यंत सत्यातील व्यवहार दोन भिन्न आणि स्वतंत्र करारांचे प्रतिनिधित्व करत नाही आणि त्याप्रमाणे स्पष्ट आहे, तर राज्याला विक्रीचा करार हा सेवा प्रदान करण्याच्या करारापासून विभक्त करण्याचा आणि विक्रीवर कर लादण्याचा अधिकार नाही;

य)   म्हणून अनुच्छेद ३६६(२९अ) अंतर्गत येणाऱ्या दोन करारांव्यतिरिक्त, सेवा करारांसाठी चाचणी 'पक्षकरांकडे वस्तूंच्या विक्रीतून उद्भवणारे वेगळे अधिकार आहेत का, असे त्यांच्या मनात आहे किंवा असा त्यांचा हेतू आहे का? असा कोणताही हेतू नसल्यास, कराराचे विघटन केले गेले तरीही विक्री होणार नाही.' ; आणि

र) करार एका प्रवर्गात येतो की दुसऱ्या प्रवर्गात येतो हे ठरवण्यासाठीची चाचणी आहे की, अन्यथा कराराच्या तथ्याला काय म्हणायचे, याला प्रबळ स्वरूपाची चाचणी म्हणतात.

३.४   असे सादर करण्यात येते की, म्हणून असे विचारात घेणे आवश्यक आहे की, करार करणाऱ्या पक्षकारांचा दोन्ही वस्तू आणि सेवांचे हस्तांतरण एकतर स्वतंत्रपणे किंवा अविभाज्य पद्धतीने किंवा संमिश्र पद्धतीने करावयाचा हेतू आहे का?

३.५   श्री एन. वेंकटरामन, विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्ता यांनी त्यांच्या निवेदनाच्या समर्थनार्थ खालील उदाहरणे देखील सादर केली आहेत की पवज च्या निर्मितीच्या उद्देशाने उत्तरवादीने आयात केलेल्या विविध नमुन्यांचे "अभियांत्रिकी संकल्पचित्र आणि रेखाचित्रे" सेवा कर आकारण्यायोग्य आहेत आणि त्यावर वस्तू म्हणून कर आकारला जाऊ शकत नाही:

i) जर करार करणारे पक्षकार अ आणि ब कारखान्यात उभारणी, स्थापना आणि कार्यान्वित करणे यासाठी मोठ्या बॉयलरच्या खरेदीसाठी सहमत असतील, तर करार करणाऱ्या पक्षकरांचा हेतू बॉयलरच्या विक्रीची वस्तू म्हणून आणि उभारणी, स्थापना आणि कार्यान्वित करणे याची सेवा म्हणून कल्पना करेल. हा करार एकतर विभाज्य, अविभाज्य किंवा संमिश्र अस् शकतो. कराराचे स्वरूप काहीही असो, इच्छुक पक्षकारांनी वस्तूंची विक्री आणि सेवा प्रदान या दोन्हीसाठी करार केला आहे.

ii) एक रूग्ण रूग्णालयात वैद्यकीय उपचार घेत आहे आणि डॉक्टरांनी हृदय शस्त्रक्रिया आणि स्टेंट घालण्याचा सल्ला दिला होता. येथे पुन्हा, दोन घटकांचा समावेश आहे. रूग्णालयातून स्टेंटचे रूग्णाच्या शरीरात हस्तांतरण आणि रूग्णालयामार्फत डॉक्टरांद्वारे वैद्यकीय सेवा प्रदान करणे. जरी त्यात वस्तू (स्टेंडस) आणि सेवा (वैद्यकीय सेवा/रुग्णालय सेवा) या दोन्हींचा समावेश असला तरीही, करार करणाऱ्या पक्षकारांचा म्हणजेच, रुग्ण आणि रुग्णालय यांचा विक्री आणि सेवा ह्या २ बाबी , स्टेंटची खरेदी आणि विक्री करण्याचा आणि वैद्यकीय सेवा प्रदान करण्याचा हेतू नाही. विक्री आणि सेवा. हा करार मूलत: वैद्यकीय सेवा प्रदानाचा आहे आणि सेवा देण्याच्या ओघात, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, रुग्णाच्या शरीरात एक स्टेंट घातला जातो.

३.६ वरीलप्रमाणे निवेदन करून, प्रस्तुत अपील मान्य करावे अशी प्रार्थना करण्यात आली.

४. उत्तरवादीच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वरिष्ठ वकील श्री व्ही. श्रीधरन यांनी असे सादर केले आहे की, प्रस्तुतच्या अपील मध्ये नेमका प्रश्न हा आहे की, “ग्राहकाने दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार तयार केलेल्या माध्यमात असलेल्या सानुकूल रेखाचित्रे/ संकल्पचित्र यांच्या शुद्ध विक्रीवर (मानीव विक्री नाही) सेवा कर आकारला जाऊ शकतो का.”

४.१ असे सादर करण्यात आले की, कायद्याच्या प्रस्थापित स्थितीनुसार, ग्राहकाने दिलेल्या विनिर्देशांनुसार वस्तूंचा पुरवठा केल्यास त्यास देखील मालाची विक्री असे मानले जाते.

४.२ असे सादर करण्यात आले की, पहिला प्रश्न असा आहे की, ग्राहकाने दिलेल्या विनिर्देशानुसार वस्तूंचा पुरवठा हा वस्तूंच्या विक्रीचा करार आहे की केवळ मजुरी वर काम करण्याचा करार आहे. असे सादर करण्यात आले की, **हिंदुस्तान शिपयार्ड लि. वि. आ. प्र. राज्य (२०००) ६ एस. सी. सी. ५७९** मध्ये नोंदविलेल्या या प्रकरणात, असे गृहीत धरण्यात आले होते की, पुरवठा करण्यात येणाऱ्या वस्तुंना जर पुरवठा करण्याआधी, पुरवठा करणाऱ्या व्यक्तीची एकमेव मालमत्ता म्हणून कोणतेही वैयक्तिक अस्तित्व असेल तर,

मग ती विक्री आहे. पुढे, जर बांधकामात वापरल्या जाणाऱ्या मोठ्या प्रमाणातील सामग्री हि उत्पादक जो अंतिम उत्पादन पैशासाठी विकतो त्याच्या मालकीची असेल तर तो या निष्कर्षासाठी एक मजबूत सूचक आहे की, हा करार वस्तूंच्या विक्रीसाठी आहे आणि मजुरीच्या कामासाठी नाही.

४.३ उत्तरवादीच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वरिष्ठ वकिलाने **असोसिएटेड सिमेंट कंपनी लि. विरुद्ध सीमाशुल्क आयुक्त, (२००१) ४ एस. सी. सी. ५९३** मध्ये नोंदवलेल्या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयावर भिस्त ठेवली आहे. असे सादर करण्यात आले की, या न्यायालयाने या निर्णयामध्ये, असे गृहीत आहे धरले होते की, कोणतेही माध्यम ज्यामध्ये रेखाचित्रे किंवा संकल्पचित्रे असतील तर ती सीमाशुल्क कायद्याच्या तरतुदींनुसार वस्तू म्हणून गणली जातील. असे निरीक्षण करण्यात आले आहे की, या वस्तू जंगम वस्तू आहेत आणि सीमाशुल्क कायद्याच्या कलम २ (२२) (इ) मध्ये समाविष्ट केल्या जातील. असे निरीक्षण करण्यात आले आहे आणि गृहीत धरण्यात आले की, तंत्रज्ञान किंवा कल्पना हे अनुरूप आहेत या वस्तुस्थितीमुळे काहीही फरक पडणार नाही.

४.४ उत्तरवादीच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वरिष्ठ वकील श्री. वि. श्रीधरन यांनी असे सादर केले की, **असोसिएटेड सिमेंट कंपनीज लिमिटेड**

(उपरोल्लेखित) या प्रकरणात या न्यायालयाचा निर्णय हा, निव्वळ वस्तूंच्या विक्रीवर सेवा कर आकारला जाऊ शकत नाही या प्रस्तावासाठी अधिकारिता असू शकत नाही, हे खरे असू शकते. हा निर्णय निश्चितपणे एखाद्या माध्यमावरील संकल्पचित्रे हि वस्तूंच्या नैसर्गिक व्याख्येनुसार वस्तू असे मानल्या जातील या प्रस्तावासाठी एक अधिकारिता आहे. असे सादर करण्यात आले आहे की, सदर निर्णय हा आयातदाराने मूळ पुरवठादाराला दिलेली रक्कम ही दुसरे तिसरे काही नसून अशा वस्तूंच्या विक्रीची किमंत आहे या प्रस्तावासाठी ही एक अधिकार आहे.

४.५ श्री. वि. श्रीधरन, विद्वान वरिष्ठ वकील यांनी देखील **टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस विरुद्ध ए. पी. राज्य (२००५) १ एस. सी. सी. ३०८** मध्ये नोंदवलेल्या प्रकरणातील, या न्यायालयाच्या घटनापीठाच्या निर्णयावर भिस्त ठेवली आहे. असे सादर करण्यात आले आहे की, या निर्णयात, प्रश्न असा होता की, केवळ अपीलकर्त्याचे कॅन्ड सॉफ्टवेअर हे "वस्तू" म्हणता येईल का आणि अशाप्रकारे ते आंध्र प्रदेश सामान्य विक्री कर अधिनियम १९५७ अंतर्गत विक्री कर आकारणीयोग्य आहे. असे सादर करण्यात आले आहे की, या निर्णयामध्ये, या न्यायालयाने **असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि. (उपरोल्लेखित)** या प्रकरणातील निर्णयाला कायम केले आणि असे गृहीत धरले की, बौद्धिक

संपदा जी, एकदा माध्यमावर टाकली की मग ती पुस्तके किंवा कॅनव्हास (पेंटिंगच्या बाबतीत) किंवा कॉम्प्युटर डिस्क्स किंवा कॅसेट्स या स्वरूपात असो आणि त्यांचे विपणन केले, तर ती " वस्तू " होईल.

४.६ पुढे असे सादर करण्यात आले आहे की, सेवा कर कायद्याचा हेतू वस्तूंच्या विक्रीवर सेवा कर आकारण्याचा नाही. असे सादर करण्यात आले आहे की, वस्तूंच्या विक्रीवर विक्री कर आकारला जातो, तर सेवा कर हा सेवेच्या तरतुदीवर आकारला जातो. असे सादर करण्यात आले आहे की, त्यामुळे किंमतीसाठी वस्तूंचे हस्तांतरण सेवा कराच्या अधीन असू शकत नाही.

४.७ असे सादर करण्यात आले आहे की, हे खरे आहे की, व्यवहाराचे विविध पैलू यांवर स्वतंत्र तरतुदींद्वारे कर आकारला जाऊ शकतो. पैलूचा सिद्धांत दोन भिन्न पैलू किंवा व्यवहारा वैशिष्टे यांच्या कर आकारणीस परवानगी देतो. उदाहरणार्थ, केटरिंग कॉन्ट्रॅक्टमध्ये, अन्नाचा पुरवठा हा मूल्यवर्धित कराच्या अधीन होता आणि सेवा पैलू हा सेवा कराच्या अधीन होता. तथापि, **बी. स. एन. एल. (उपरोल्लेखित)** या प्रकरणात, या न्यायालयाने असे निरीक्षण केले आहे की, पैलू सिद्धांत हा वस्तूंच्या मूल्याचा सेवांमध्ये समावेश आणि त्याउलट करण्यास परवानगी देत नाही. सदर निकालाच्या, परिच्छेद ५५ मध्ये केलेल्या निरीक्षणांवरवर भिस्त ठेवण्यात आली आहे.

४.८ श्री. वि. श्रीधरन, उत्तरवादीच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वरिष्ठ वकील यांनी हे पुढे सादर केले की, उत्तरवादीने सी. उ. से. क. अ. न्या. समोर एक विनिर्दिष्ट मुद्दा मांडला की, परदेशी संस्थेद्वारे प्रदान केलेल्या सेवा (जर काही असल्यास) या " संकल्पचित्र सेवांच्या " कक्षेत येणार नाहीत. उत्तरवादीने असाही एक विनिर्दिष्ट मुद्दा उपस्थित केला की, मर्यादेचा विस्तारित कालावधी याचा फायदा घेता येणार नाही . तथापि, जरी सदर निवेदन हे सी. उ. से. क. अ. न्या. समोर नमूद केलेले असले तरी, सी. उ. से. क. अ. न्या. ने त्या विधानांचा परामर्श घेतला नाही आणि त्यामुळे या सर्व प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी हे प्रकरण सी. उ. से. क. अ. न्या. कडे परत पाठवले जावे अशी मागणी केली आहे.

५. आम्ही संबंधित पक्षकारांच्या विद्वान वकीलांचे म्हणणे विस्ताराने ऐकले आहे.

प्रस्तुत अपीलांमध्ये ज्या मुद्द्यावर निर्णय घ्यायचा आहे तो म्हणजे मुद्दा हा आहे की, सहयोगी कंपनीने "वादतीत कालावधीत, म्हणजेच जून, २००७ ते सप्टेंबर, २०१० या कालावधीत नोटिसी द्वारे " अभियांत्रिकी संकल्पचित्र ” आणि “ रेखाचित्रे " आयात करण्याची केलेली कृती हि वित्त अधिनियम, १९९४ च्या कलम ६५(३५ ब) सह कलम ६५ (१०५) (झेड झेड झेड झेड डी)

अंतर्गत " संकल्पचित्र सेवा " या करपात्र श्रेणी अंतर्गत वर्गीकृत आहे की नाही.

५. १ वरील मुद्द्याचा विचार करताना, वित्त अधिनियम, १९९४ अंतर्गत " संकल्पचित्र सेवा " ची व्याख्या, जी आक्षेपित कालावधी दरम्यान जशी होती ती तशीच विचारात घेणे आवश्यक आहे, जी खालीलप्रमाणे वाचावी:

कलम ६५. व्याख्या : - या प्रकरणात, संदर्भ अन्यथा आवश्यक असल्याशिवाय,

....

(३६ ब) " संकल्पचित्र सेवा " यामध्ये फर्निचरचे डिझायनिंग, ग्राहक उत्पादने, औद्योगिक उत्पादने, पॅकेजेस, लोगो, ग्राफिक्स, वेबसाइट्स आणि कॉर्पोरेट आयडेंटिटी डिझायनिंग आणि त्रिमितीय प्रतिमांचे उत्पादन यांच्या संदर्भात प्रदान केलेल्या सेवांचा समावेश आहे:

....

(१०५) (झेड झेड झेड झेड डी) "करपात्र सेवा" म्हणजे इतर कोणत्याही व्यक्तीने एखाद्या व्यक्तीला " संकल्पचित्र " सेवांच्या संदर्भात, पुरवलेली सेवा किंवा पुरवण्यात येणारी सेवा, (झेड झेड झेड झेड डी), परंतु त्यात खालील सेवांचा समावेश नाही

(i) उपखंडात (क्यू) उल्लेखित इंटिरिअर डेकोरेटरद्वारे पुरवलेली सेवा

आणि

(ii) उप-खंड (झेड वि) मध्ये उल्लेखित फॅशन डिझायनरने फॅशन डिझायनिंगच्या संदर्भात पुरवलेली सेवा

आणि त्यानुसार, " सेवा पुरवणारा " या शब्दाचा अर्थ लावला जाईल.

अशाप्रकारे, "संकल्पचित्र सेवांची" ची व्याख्या विस्तृत आणि निर्णायक आहे, विशेषत: फक्त फॅशन डिझाईन आणि इंटिरियर डिझायनिंग वगळून, जे आधीपासून स्वतंत्र करपात्र श्रेणी अंतर्गत करपात्र होते, असे दिसून येते.

६. प्रस्तुत प्रकरणात, उत्तरवादी हा पवन विद्युत जणिंत्रांचे (प वि ज) च्या निर्मितीमध्ये गुंतलेला होता. त्याने त्याच्या तीन सहयोगी कंपन्यांसोबत ' उत्पादन विकास आणि खरेदी करार ' केला. करारातील संबंधित खंड, विशेषत: जी ' उत्पादनाची ' व्याख्या करतात ती खालीलप्रमाणे वाचावीत.

१.१०.१ सर्व संबंधित आणि समर्पक घटकांसह ' किमान क्षमतेचे गियर असलेले प. वि .ज. यांच्या सर्व नमुन्याचे ‘ संकल्पचित्र आणि विकास ' आणि त्यामध्ये आवश्यक असलेले ;

१.१०.२ 'सुझलॉन फ्लेक्सिस्लिप सिस्टम' चे ‘ संकल्पचित्र आणि विकास ' सर्व संबंधित आणि समर्पक घटकांसह आणि त्यामध्ये आवश्यक

असलेले ;

१.१०.३ मेसर्स एस ई जी द्वारे विकसित केलेली सर्व आणि कोणतीही उत्पादने जी मेसर्स एस ई जी आणि त्याच्या एजंटनी आणि कर्मचाऱ्यांनी कराराअंतर्गत कर्तव्ये पार पाडत असताना त्यांना सुचलेली (नियमित व्यवसायाच्या वेळेत प्रत्यक्षात नवीन कल्पना सुचलेली किंवा न सुचलेली) त्यांनी शोधलेली किंवा तयार केलेली.

१.१०.४ वरील संदर्भात अभ्यास नियोजन कृती, उत्पादन प्रक्रिया तपशील असलेली सामग्री आणि कागदपत्रे यांसह दस्तऐवजीकरण.

१.१०.५ वरील संदर्भात वेळोवेळी केलेल्या सर्व सुधारणा आणि वरील अंतर्गत विकसित आणि अंतर्भूत केलेल्या इतर सर्व सुधारणा.

१.१०.६ बौद्धिक संपदा आणि त्यासंबंधित बौद्धिक संपदा अधिकार जोपर्यंत ते जर्मन आविष्कार कायद्याच्या मालकीचे आहेत.

७. या टप्प्यावर, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, उत्तरवादींनी सदर संकल्पचित्रे केवळ भारताच्या प्रदेशात वापरायला हव्या होत्या आणि ते एक टेलरमेड डिझाइन होते. प. वि .ज. च्या निर्मितीमध्ये वापरल्या जाणाऱ्या " अभियांत्रिकी संकल्पचित्र आणि रेखाचित्रे " च्या कृतीसाठी उत्तरवादीने मेसर्स एस ई जी या सहयोगी कंपनीला बद्ध केले, जे कागदावर ब्लू प्रिंट म्हणून

रूपांतरित केले गेले आणि उत्तरवादीला त्याच माध्यमावर पाठवले गेले. मंडळाने दिनांक १८.०३.२०११ रोजी, पॅकेज सॉफ्टवेअरवर अप्रत्यक्ष कर लागू होण्याच्या मुद्द्यावर दिलेल्या स्पष्टीकरणानुसार देखील अशी " संकल्पचित्रे " सुद्धा सेवा कराच्या अधीन होती. त्यामुळे, अशाप्रकारे उत्तरवादी परदेशातून रिव्हर्स चार्ज अंतर्गत प्राप्त झालेल्या " संकल्पचित्र सेवांवर " सेवा कर भरण्यास पात्र होता. असे देखील आढळून आले की, मेसर्स एस ई जी हे संबंधित घटक होते, म्हणजेच, करदात्याच्या उपकंपनीचे आणि करदाता - उत्तरवादीकडून मेसर्स एस ई जी यांना "अभियांत्रिकी संकल्पचित्र आणि रेखाचित्रे" या सेवेसाठी प्राप्त रक्कम ही त्यामुळे ' सहयोगी एंटरप्राइझ ' या संकल्पनेच्या दृष्टीने ‘ रिव्हर्स चार्ज ‘ अंतर्गत सेवा करास पात्र होती.

८. वरीलप्रमाणे असूनही, मेसर्स एस ई जी ने करदात्याला 'कागद' असे समजून त्याच्यावर बिल काढले तथापि, जेव्हा सदर प्रवेशाचे देय, ' कागद ' असे मानून सादर केले गेले ज्यासाठी देय कर ' शून्य ' होता. त्यामुळे, ' कागद ' मानून कर भरण्यापासून सूट दिल्याने कोणतेही सीमा शुल्क भरले गेले नव्हते किंवा सेवा कर भरला गेला नव्हता. सविस्तर न्यायनिर्णय आणि आदेशाद्वारे, आयुक्तांनी असे गृहीत धरले की, उत्तरवादी " संकल्पचित्र सेवा " या करपात्र श्रेणी अंतर्गत सेवा कर भरण्यास पात्र आहे. तथापि, आक्षेपित न्यायनिर्णय

आणि आदेशाद्वारे, सी. उ. से. क. अ. न्या. ने असे गृहीत धरले आहे की, उत्तरवादी, वित्त अधिनियम, १९९४ अंतर्गत " संकल्पचित्र सेवा " अंतर्गत सेवाकर भरण्यास, मुख्यतः, सीमा प्राधिकरणाने त्यास ' वस्तू ' मानले आहे या कारणास्तव पात्र नव्हते आणि म्हणून त्या कृतीला ' वस्तू ' आणि ' सेवा ' म्हणून कर लावला जाऊ शकत नाही. वरील दृष्टिकोन पूर्णपणे चुकीचा आहे. **बी .स . एन. एल. (उपरोल्लेखित)** या केसमध्ये या न्यायालयाने निरीक्षण केल्याप्रमाणे आणि गृहीत धरल्याप्रमाणे, पैलू सिद्धांत लागू करून वेगवेगळ्या शीर्षकाखाली दोन भिन्न कर/आकारणी असू शकतात. कायद्याच्या स्थापित स्थितीनुसार, आता सदर कृती वर ' वस्तू ' आणि ' सेवा ' म्हणून कर लावला जाऊ शकतो या अटीवर की, करार हा अविभाज्य आहे आणि सेवा कर आकारणी हि सेवांच्या पैलूंवर असेल. सी. उ. से. क. अ. न्या. ने आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश देताना उपरोक्त पैलूचा अजिबात विचार केला नाही. वर निरीक्षण केल्याप्रमाणे, " संकल्पचित्र सेवांची " व्याख्या अतिशय स्पष्ट आहे आणि ती सर्व " संकल्पचित्र सेवांचा " समावेश करण्यासाठी पुरेशी विस्तृत आहे. केवळ सहयोगी कंपनीने तयार केलेले आणि पुरवठा केलेले "अभियांत्रिकी संकल्पचित्र आणि रेखाचित्रे" सीमाशुल्क कायद्यांतर्गत ' वस्तू ' म्हणून दाखविण्यात आल्याने आणि प्रवेशाचे देयामध्ये त्यामुळेच अशा सेवांना

" वित्त अधिनियम, १९९४ अंतर्गत " संकल्पचित्र सेवांच्या " परिभाषेतून बाहेर काढण्याचे कारण असू शकत नाही.

९. अन्यथा, **बी .स . एन. एल. (उपरोल्लेखित)** या केसमध्ये या न्यायालयाने निरीक्षण केल्याप्रमाणे, वस्तूंची विक्री आणि सेवा करार यामध्ये फरक आहे. संबंधित काय आहे तर करार करणाऱ्या पक्षांचा हेतू काय आहे आणि करार करणाऱ्या पक्षांना एकतर स्वतंत्रपणे किंवा अविभाज्य पद्धतीने किंवा संमिश्र पद्धतीने वस्तू आणि सेवा या दोन्हींचे हस्तांतरण करायचे आहे का. या न्यायालयाच्या **बी .स . एन. एल. (उपरोल्लेखित)** या केसमध्ये दिलेल्या निर्णयामध्ये, हा मुद्दा करदात्याच्या विरोधात आणि महसुलाच्या बाजूने प्रामाणिकपणे अंतर्भूत करतो. म्हणूनच , सी. उ. से. क. अ. न्या. ने घेतलेला सदर कृती ही वस्तू आणि सेवा म्हणून करपात्र होत नाही हा दृष्टिकोन पूर्णपणे चुकीचा आहे. सी. उ. से. क. अ. न्या. ने, विशेषत:, आयुक्तांनी परिच्छेद २० पासून नोंदवलेल्या निष्कर्षांवर आणखी पुढे कोणतीही चर्चा केलेली नाही,. या परिस्थितीत, सेवा कर आकारणी बाजूला ठेवून, सी. उ. से. क. अ. न्या. ने दिलेला आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश हे न टिकण्याजोगे आहेत आणि ते खारीज करून रद्द करण्यात यावेत.

तथापि, त्याच वेळी, सी. उ. से. क. अ. न्या. समोर उपस्थित केलेले इतर कारण, म्हणजे, " एखाद्या परदेशी संस्थेद्वारे प्रदान केलेल्या सेवा (जर काही असल्यास) " संकल्पचित्र सेवांच्या " कक्षेत येतात किंवा नाही आणि मर्यादेच्या कालावधी वाढवण्याची मागणी सी. उ. से. क. अ. न्या. ने विचारात घेतली नाही आणि म्हणून उत्तरवादीच्या विद्वान वकिलांनी वरील दोन कारणांवर निर्णय घेण्यासाठी प्रकरण सी. उ. से. क. अ. न्या. कडे परत पाठवण्याची विनंती करणे न्याय्य आहे.

१०. वर नमूद केल्याप्रमाणे आणि वर नमूद केलेल्या कारणास्तव, सी. उ. से. क. अ. न्या. ने उत्तरवादी हा वित्त अधिनियम, १९९४ च्या कलम ६५(३५ ब) सह कलम ६५ (१०५) (झेड झेड झेड झेड डी) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे पवन विद्युत जणिंत्रांचे निर्मिती करण्याकरिता " अभियांत्रिकी संकल्पचित्र आणि रेखाचित्रा " च्या विविध नमुन्यांच्या आयातीवर " संकल्पचित्र सेवा " म्हणून सेवा कर भरण्यास पात्र नाही असे गृहीत धरून पारित केलेला न्यायनिर्णय आणि आदेश हा खारीज करून रद्द करण्यात येत आहे. तथापि, हे प्रकरण उत्तरवादीच्या वतीने उपस्थित केलेल्या कारणांचा म्हणजेच, एखाद्या परदेशी संस्थेद्वारे प्रदान केलेल्या सेवा (जर काही असल्यास) त्या " संकल्पचित्र सेवांच्या " कक्षेत येत नाहीत आणि विभागाला मर्यादेच्या

कालावधी वाढवण्याची मागणी करणे न्याय्य नव्हते यांचा विचार करण्यासाठी सी. उ. से. क. अ. न्या. कडे परत पाठवले जात आहे. हे स्पष्ट करण्यात येत आहे की, उपरोक्त दोन कारणांचा विचार करण्यासाठी हे प्रकरण सी. उ. से. क. अ. न्या. कडे परत पाठवले आहे आणि अन्य कोणत्याही कारणासाठी नाही. " अभियांत्रिकी संकल्पचित्र आणि रेखाचित्रे " यांवर सेवा कर आकारणीचा मुद्याचा संबंध आहे, तर सदरचा निर्णय महसुलाच्या बाजूने आणि करदात्याच्या विरोधात दिला आहे .

११. वरील अटींनुसार तातडीचे अपील निकालात काढले. तथापि, खटल्यातील वस्तुस्थिती आणि परिस्थितीत, खर्चाबाबत कोणताही आदेश नसावा.

.... न्या.

[श्री. एम. आर. शहा]

.... न्या.

[कृष्णा मुरारी]

नवी दिल्ली;

१० एप्रिल, २०२३. नवी दिल्ली;

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x